## रविवार दिनांक १३ नोव्हेंबर २०२२ रोजी श्री सिद्धलक्ष्मी गणेश मंदिर जांभुळपाडा येथे आयोजित ३०व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

अभ्यंकर मंडळाची ३० वी वार्षिक सर्वसाधारण सभा व स्नेह संमेलन रविवार दिनांक १३ नोव्हेंबर 2022 रोजी श्री सिद्धलक्ष्मी गणेश मंदिर जांभुळपाड येथे संपन्न झाले. चहा नाश्ता झाल्यावर संमेलनास सुरवात झाली.

उपस्थितांचे स्वागत करून मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. भगवान श्री परशुराम,  श्री योगेश्वरी देवी श्री व्याडेश्वर व श्री गणपती च्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. तद्नंतर ज्ञात व अज्ञात दिवंगत अभ्यंकराना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली .

श्री. राहूल विजय अभ्यंकर विरार यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचलन केलं. प्रथेप्रमाणे उपस्थितांतून श्री रामकृष्ण अभ्यंकर जांभूळपाडा यांची संमेलनाध्यक्ष म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली. मंडळाचे अध्यक्ष श्री निशिकांत शंकर अभ्यंकर यांच्या अनुपस्थितीत मंडळाचे उपाध्यक्ष श्री नरेन्द्र अनंत अभ्यंकर यांनी अध्यक्ष स्थान भूषविले.

संमेलनाध्यक्षांचा परिचय करून दिल्यानंतर श्री नरेन्द्र अनंत अभ्यंकर यांनी श्री रामकृष्ण अभ्यंकर यांचे शाल, श्रीफळ व पुष्प गुच्छ देऊन स्वागत व सत्कार केला. संमेलनाध्यक्षांच्या परवानगीने सभेस सुरवात करण्यात आली. या वेळी खालील ठराव सर्वानुमते संमत करण्यात आले .

१) २५डिसेंबर २०२१ रोजी ब्राम्हण सभा ठाणे येथे झालेल्या सभेच इतिवृत सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

२) सन २०२१-२०२२ चा जमा खर्च व ताळेबंद अहवालाचे वाचन करण्यात येऊन सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

३ ) श्री गिरीश गावडे आणि कंपनी चार्टड अकौटट यांची सन २०२२ -२३ साठी सनदी लेखापाल यांची नियुक्ती करण्यात यावी व त्यांचे मानधन ठरविण्याचे अधिकार कार्यकारणीस देण्यात यावे असा प्रस्ताव मांडण्यात आला.

सूचक: संपदा लिलाधर अभ्यंकर     अनुमोदक: विजय भास्कर अभ्यंकर

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

संमेलनाध्यक्ष व अध्यक्ष श्री नरेन्द्र अनंत अभ्यंकर यांच्या हस्ते खालील सत्कार करण्यात आले.

विशिष्ट क्षेत्रात विशेष नैपुण्य प्राप्त करणाऱ्यां मान्यवरांना कै. ज. द. अभ्यंकर यांच्या स्मरणार्थ प्रशस्ती पत्रक व सन्मान चिंन्ह देऊन "नैपुण्य पुरस्कार" मंडाळातर्फे प्रदान करण्यात येतो.

पुरस्कारार्थी:

१) स्वरांगी संजय अभ्यंकर, कराटे साठी

२ )आनंद अभ्यंकर, नाशिक समाज सेवा

३) माधव अभ्यंकर, पनवेल पक्षीमित्र

खालील दांपत्याचा विवाहास ५० वर्षे व वयाच्या अमृतमहोत्सवानिमित्त शाल व श्रीफळ देऊन सत्कार व अभीष्टचिंतन करण्यात आले.

श्री प्रभाकर विद्याधर अभ्यंकर व सौ मृणालिनी प्रभाकर अभ्यंकर

दोघांनीही आपले मनोगत व्यक्त करुन मंडळाचे आभार मानले.

या वर्षी उद्योग क्षेत्रात विशेष कामगिरी करणाऱ्या उद्योजकाचे नाव मंडळाकडे न आल्याने कै. मंगला गोपाळ अभ्यंकर यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा "उद्योगश्री पुरस्कार" प्रदान करण्यात आला नाही.

कै . सुधाकर उर्फ बापू अभ्यंकर यांच्या स्मरणार्थ मंडळाकडून शैक्षणिक क्षेत्रात यश मिळविणाऱ्या खालील विद्यार्थ्यांचा सन्मान चिन्ह व प्रशस्ती पत्रक देऊन सन्मान करण्यात आला.

१) अनन्या अमित जोशी  १०वी

२) मिहीर विश्वास अभ्यंकर  १२वी

गुलाबाचे फूल देऊन डॉ.संपदा अभ्यंकर यांनी उपस्थित माहेरवाशिणींचा सत्कार केला. या प्रसंगी उपस्थित माहेरवाशीणींनी आपले मनोगत व्यक्त केले .

मंडळाला देणगी दिलेल्या देणगीदारांचा संमेलनाध्यक्ष व अध्यक्षांनी सन्मान चिन्ह व पुष्पगुच्छदेऊन सत्कार केला .

मंडळाचे सचीव श्री विवेकानंद दतात्रय अभ्यंकर यांनी मंडळाच्या वेबसाइट वर उपलब्ध विविध विषय तसेच व अभ्यंकर ई-कुल्वृतांत कसा बधावा ह्या बद्दल माहिती दिली.

तदनंतर संमेलनाध्यक्ष श्री रामकृष्ण यांनी आपले विचार व्यक्त करून सभेस मार्गदर्शन केले.

सभेचे पहिले सत्र संपन्न झाले असे अध्यक्ष श्री नरेन्द्र अनंत अभ्यंकर यांनी जाहीर करून उपस्थितांचे तसेच सभा व संमेलन यशस्वी करण्यास हातभार लावणाऱ्या सर्वांचे आभार मानले.

तदनंतर श्री राहूल विजय अभ्यंकर यांनी “पुरातन मूर्तीच्या अनुषंगाने” स्लाइड-शो द्वारे विस्तृत माहिती दिली.

श्री माधव अभ्यंकर यांनी विविध पशुपक्षांची स्लाइड-शो द्वारे सविस्तर माहिती दिली.

कु. लीना अशोक अभ्यंकर यांनी “नकारात्मकते वर कशी मात करावी” या विषयावर सविस्तर माहिती देत प्रात्यक्षिकासह उपस्थितांना दाखविले.

पुढील संमेलन सांगली येथे घेण्यात यावे अशी इच्छा सांगली येथील श्री हणमंत अभ्यंकर व श्री राजशेखर अभ्यंकर यांनी व्यक्त केली .

चहापानानंतर संमेलनाची सांगता झाली.